**नियमीत दिवाणी अपील क्रमांक ९५/२००८ मधील**
**निशाणी २८ व ३१ वरील आदेश**
**(शिवाजी व इतर वि. पांडूरंग व इतर)**
**(घोषित दिनांक : ०५/०१/२०२३)**

**अर्जाचे स्वरूप.**

१. उत्तरार्थी क्रमांक ३–तुकाराम भाऊ शेंडगे (यांस यापुढे 'उत्तरार्थी' असे म्हंटले आहे) मयत झाल्यामुळे अपीलार्थी यांनी प्रस्तुतचा अर्ज उत्तरार्थी यांचे वारसांना या कामी सामील करण्यासाठी झालेला विलंब माफ होणेसाठी आणि उत्तरार्थी याचे विरुध्द प्रस्तुतचे अपिल उपशमित (abate) झालेचा आदेश रद्द होऊन त्याचे वारस यांना या कामी सामील होवून मिळणेसाठी केले आहेत.

**अर्जातील कथन.**

२. उत्तरार्थी हा दिनांक सप्टेंबर २०१३ मध्ये मयत झाला आहे. उत्तरार्थी याचे वारसांना या अपीलाचे कामी सामिल करून घेणे गरजेचे होते. मात्र, उत्तरार्थी याचे वारस (यास यापुढे 'उत्तरार्थी याचे वारस' असे म्हंटले आहे) यांना या अपिलाचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणेसाठी विलंब झालेला आहे. उत्तरार्थी याचे वारस यांना या कामी मुदतीत सामील न केल्यामुळे प्रस्तुतचे अपील उत्तरार्थी याचे विरूध्द उपशमित झाला आहे.

३. अपीलार्थीने उत्तरार्थी याचे वारस यांना याकामी सामील करुन घेण्यासाठी जाणून बुजून विलंब केलेला नाही. अपीलाचे कामी गुणदोषावर निकाल होण्यासाठी आणि न्यायाच्या हेतुस्तव उत्तरार्थी याचे वारसांना याकामी सामिल करणे जरूर आहे. त्यामुळे उत्तरार्थी याचे वारस यांना या अपीलाचे कामी सामील करणेसाठी झालेला विलंब माफ करून उत्तरार्थी याचे विरुध्द अपील उपशमित झालेचा आदेश रद्द होऊन उत्तरार्थी याचे वारस यांना या अपीलाचे कामी सामिल करून घेण्यासाठी सदरचे अर्ज अपीलार्थी यांना दाखल करणे भाग पडले आहे.

४. सबब, अर्ज मंजूर करण्यांत यावेत.

**उत्तरार्थी आणि उत्तरार्थी यांचे वारस – विना म्हणणे.**

५. उत्तरार्थी आणि उत्तरार्थी यांचे वारस हे याकामी हजर आहेत. तथापि, त्यांनी

म्हणणे दिलेले नाही.

६. सबब, सदरचा अर्ज उत्तरार्थी आणि उत्तरार्थी यांचे वारस यांचेविरुद्ध विना म्हणणे चालला आहे.

## युक्तीवाद.

७. अपीलार्थी यांचे तर्फे वकील श्री. डी. व्ही. जहागीरदार यांचा विस्तृत (at length) युक्तीवाद ऐकला आणि उत्तरार्थी यांच्या वारसातर्फे वकील श्री. व्ही. बी. चव्हाण यांनी कायद्याच्या मुद्दयावर (on law points) लेखी युक्तिवाद (निशाणी ८८) दिला आहे. तो वाचला.

८. अपीलार्थी व उत्तरार्थी यांचे वारस यांनी अर्जातील कथनांचा व कायदेशीर तरतुदीच्या अनुषंगाने त्यांचा युक्तीवाद मांडला त्यामुळे तो उध्दृत करण्याची गरज नाही.

## मुद्दे (points) व उत्तरे

९. अपीलार्थी व उत्तरार्थी यांचे वारस यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर व वाचल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमुद केलेल्या कारणासाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत :–

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द होऊन मिळण्याचा अर्ज देण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी योग्य कारण असल्याचे (the appellants have sufficient cause for not making the application within time prescribed by law) अपीलार्थी शाबीत करतात का ? | होय. |
| २. | अपीलार्थी मागतात त्याप्रमाणे उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करता येईल का ? | होय अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ३. | अपीलार्थी मागतात तशी दुरूस्ती मंजूर करता येईल का ? | होय अंतिम आदेशाप्रमाणे. |

| | | |
|---|---|---|
| ४. | काय आदेश ? | अर्ज मंजूर. अंतिम आदेशाप्रमाणे. |

**दावा उपशमित झाला असेल तर काय करावे याबाबत कायदेशीर तरतुदी व मार्गदर्शक तत्वे (Legal Position).**

१०. नामदार सर्वोच्च न्यायालयाने मिठाईलाल दलसंगर सिंग व इतर विरुध्द अन्नाबाई देवराम किनी व इतर, २००३(४) एमएचएलजे ७४० (एससी) या अहवालित न्यायनिर्णयात एखाद्या पक्षकाराविरुध्द दावा उपशमित झाला असेल तर काय करावे याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत :–

''दावा उपशमित होण्यांबाबतच्या तरतूदींचे पालन गांभीर्याने करणे जरुर आहे. तथापि, जेंव्हा अशा प्रकारे दावा उपशमित होतो तेंव्हा तो आदेश रद्द करण्यांबाबत अर्ज आल्यास त्याचा विचार सहानुभूतीपूर्वक करणे जरुर आहे. सदर अर्जामध्ये जर अपीलार्थीने निव्वळ मयत पक्षकाराचे वारस कामी सामील करुन घेण्यांबाबतची मागणी केली असेल तरी त्याचा अर्थ त्याने सदर पक्षकाराविरुध्द दावा उपशमित करण्यांबाबतचा जो आदेश झाला आहे तो आदेश सुध्दा रद्द करुन मागितला आहे असा होतो. एकदा दावा उपशमित झाला आणि मुदतीमध्ये जर दावा ज्या पक्षकाराविरुध्द उपशमित झाला आहे त्याचे वारस कामी सामील करण्यांबाबत अर्ज दिला नसेल तर तो दावा आपोआपच उपशमित होतो. त्यासाठी स्वतंत्र आदेश करण्यांची किंवा सदरचा दावा मयत व्यक्तीविरुध्द उपशमित झाला आहे असे म्हणून आदेश पारीत करण्यांची आवश्यकता नसते. दावा ज्या मयत व्यक्तीविरुध्द उपशमित झाला आहे हिचे वारस कामी सामील करण्यांबाबत जर आदेश झाला तर त्याचा अर्थ त्या मयत व्यक्तीविरुध्द दावा उपशमित झाल्याचा आदेश रद्द झाला असाच होतो.

न्यायालयाने नेहमी हे लक्षात ठेवले पाहिजे की, एखाद्या पक्षकारास त्याच्या किंवा अन्य कुणाच्या चुकीमुळे संधी नाकारली जाऊ नये. मात्र, जर असा पक्षकार जाणूनबुजून एखाद्या कामी विलंब करीत असेल किंवा तो बेजबाबदारपणे वागत असेल तर त्याच्या लाभामध्ये कोणताही आदेश करु नये.

(8. In as much as the abatement results in denial of hearing on the merits of the case, the provision of abatement has to be construed strictly. On the other hand, the prayer for setting aside an abatement and the dismissal

consequent upon an abatement, have to be considered liberally. A simple prayer for bringing the legal representatives on record without specifically praying for setting aside for an abatement may in substance be construed as a prayer for setting aside abatement. So also a prayer for setting aside abatement as regard one of the plaintiffs can be construed as a prayer for setting aside the abatement of the suit in its entirety. Abatement of suit for failure to move an application for bringing the legal representative on record within the prescribed period of limitation is automatic and a specific order dismissing the suit as abated is not called for. Once the suit has abated as a matter of law, though there may not have been passed on record a specific order dismissing the suit as abated, yet the legal representative proposing to be brought on of the deceased party on record would seek the setting aside of an abatement. A prayer for bringing the legal representative on record, if allowed, would have the effect of setting aside the abatement as the relief of setting aside abatement though not asked for in so many words is in effect being actually asked for and is necessary implied. Too technical or pedantic an approach in such cases is not called for."

9. The Court have to adopt a justice oriented approach dictated by the upper most consideration that ordinarily a litigant ought not to be denied an opportunity of having lis determined on merits unless he has, by gross negligence, deliberate inaction or something akin to misconduct, dis-entitled himself from seeking the indulgence of the Court. The opinion of the trial Judge allowing a prayer for setting aside abatement and his finding on the question of availability of 'sufficient cause' within the meaning of sub-rule (1) of Rule (9) of Order 22 and of section 5 of the Indian Limitation Act, 1963 deserves to be given weight, and once arrived at would not normally be interfered with by superior jurisdiction.)".

११. नामदार मुंबई उच्च न्यायालयाने रामदुलारी व इतर विरुध्द मणिराम रामप्रसाद तिवारी व इतर २००५(१) सिव्हील कोर्ट केसेस २९७ (बॉम्बे) या अहवालित न्यायनिर्णयात एखाद्या पक्षकाराविरुध्द दावा उपशमित झाला असेल तर काय करावे याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत :–

''दावा उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करण्यांच्या अर्जामध्ये जर

> अपीलार्थीने निव्वळ मयत पक्षकाराचे वारस कामी सामील करुन घेण्यांबाबतची मागणी केली असेल तरी त्याचा अर्थ त्याने सदर पक्षकाराविरुध्द दावा उपशमित करण्यांबाबतचा जो आदेश झाला आहे तो आदेश सुध्दा रद्द करुन मागितला आहे असा होतो.
>
> (Civil Procedure Code, 1908, Order 22. Rule 4 and 9 - Impleading of L.R's - Setting aside abatement - Prayer for bringing on record legal representatives - Relief of setting aside abatement though not prayed is implied - Order of abatement set aside)".

१२. नामदार राजस्थान उच्च न्यायालयाने गौतम भवन निर्माण सहकारी समिती लि., जोधपूर विरुध्द श्रीमती रमणिक कुमारी व इतर, २००४(३) सिव्हील कोर्ट केसेस ३१८ (राजस्थान) या अहवालित न्यायनिर्णयात एखाद्या पक्षकाराविरुध्द दावा उपशमित झाला असेल तर काय करावे याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत :–

> ''दाव्यातील एखादा प्रतिवादी मयत झाला असेल आणि त्याचे वारसापैकी कुणी जर दाव्यामध्ये कोणत्याही अधिकारात पक्षकार असतील तर असा दावा उपशमित होत नाही.
>
> (Civil Procedure Code, 1908, Order 22 Rule 4(3) & 9, Order 43 Rule-1(k) - Death of one of the defendants - Impleading of L.R's - Failure to implead - Suit does not abate when one or some of the legal representative are already on record though in a different capacity)".

## दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम २२ मधील तरतुदी अपिलास लागू होतात, त्याबाबतची कायदेशीर तरतुद.

१३. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम २२ मधील सर्व तरतुदी या दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम २२ नियम ११ नुसार अपिलास जशाच्या तशा लागू होतात.

## मुद्दे क्रमांक १ व २ संबंधी कारणमिमांसा.

१४. उत्तरार्थी सप्टेंबर २०१३ मध्ये मयत झाल्यानंतर अपीलार्थी यांनी अर्ज दिनांक २१/०४/२०१६ रोजी म्हणजेच साधारणपणे ३ वर्षांनी दिले आहेत. भारतीय मुदतीचा कायदा, १९६३ चे कलम (Article) १२० प्रमाणे हे अर्ज मुदतीत नाहीत आणि त्यामुळे, हे अपील उत्तरार्थी याचे विरुध्द उपशमीत झालेले आहे.

१५. मुळ दाव्यातील आणि अपिलातील वादविषय हा हक्कज्ञापन आणि कायम मनाई ताकीदीसंबंधी असल्याने उत्तरार्थी याचे वारसांना त्यांची बाजू मांडण्याचा आणि त्यांना दावा/अपिल पुढे चालु ठेवण्याचा कायदेशीर अधिकारही प्राप्त होतो. त्यामुळे, उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे असे मला वाटते.

१६. अपीलार्थी यांचे या अर्जातील कथनांचा विचार करता अपीलार्थी यांनी उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द होऊन मिळण्यास अर्ज देण्यासाठी जाणूनबुजून विलंब केलेला नाही हे दिसून येते. त्यामुळे, उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे.

१७. अपीलार्थी यांचे या अर्जातील कथनांचा विचार करता उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द होऊन मिळण्यास अर्ज देण्याच्या बाबतीत ते अजिबात बेजबाबदारपणे वागलेले नाहीत हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते. त्यामुळे सुध्दा, उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे.

१८. अपीलार्थी यांचे या अर्जातील कथनांचा विचार करता माझे मता प्रमाणे मुळ वाद हा हक्कज्ञापन आणि कायम मनाई ताकीदीसंबंधी असल्याने मयत उत्तरार्थी याचे वारस या अपीलाचे कामी आवश्यक पक्षकार ठरतात आणि म्हणून त्यांना पक्षकार करून अपील पुढे चालविण्याचा कायदेशिर अधिकार उत्तरार्थी यांचे वारस यांना आहे असे मला वाटते. त्यामुळे सुध्दा, उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे.

१९. अपीलार्थी यांनी उत्तरार्थी मयत झाल्यानंतर प्रस्तुतचे अर्ज मुदतीत न दिल्यामुळे हे अपील उत्तरार्थी याचे विरुध्द उपशमीत झालेले आहे. तथापि, न्यायाचे हेतुस्तव आणि उत्तरार्थी यांचे वारस व अपीलार्थी यांचे मधील दाव्यांची/अपिलांची संख्या मर्यादित ठेवून दाव्यांचे/अपिलांचे अनेकीकरण टाळण्याच्या दृष्टीकोनातून अपीलार्थी यांचा अर्ज मंजूर करणे जरूर आहे. यासाठी आपण मिठाईलाल दलसंगर सिंग आणि इतर विरूध्द अन्नाबाई देवराव किनी आणि इतर, २००३(४) एमएच.एल.जे. ७४० (एससी) या अहवालीत न्यायनिर्णयाचा आधार घेवू शकतो.

२०. अपीलार्थी यांचे या अर्जातील कथनांचा विचार करता माझे मता प्रमाणे अपीलार्थी आणि उत्तरार्थी यांचे वारस यांच्यातील वाद हा हक्कज्ञापन आणि कायम मनाई ताकीदीसंबंधी असल्याने त्यांच्या हक्कांचा विचार करता तो पुढे चालविण्याचा अधिकार उत्तरार्थी याचे वारसांना आहे त्यामुळे सदरचे अपील उत्तरार्थी याचे विरूध्द उपशमित होत नसल्याने तो उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे असे मला वाटते. यासाठी आपण गौतम भवन निर्माण सहकारी समिती लि., जोधपूर विरुध्द श्रीमती रमणिक कुमारी व इतर, २००४ (३) सिव्हील कोर्ट केसेस ३१८ (राजस्थान) या अहवालित न्यायनिर्णयाचा आधार घेऊ शकतो.

२१. अपीलार्थी यांचे या अर्जातील कथनांचा विचार करता माझे मता प्रमाणे मूळ वाद हा हक्कज्ञापन आणि कायम मनाई ताकीदीसंबंधी असल्याने अपीलार्थी व उत्तरार्थी यांचे वारस यांचे दिवाणी स्वरुपाचे मौल्यवान हक्क (valuable civil rights) या अपीलात ठरणार आहेत. त्यामुळे, अपीलार्थी यांच्या या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन उत्तरार्थी विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द होणे जरुर आहे.

२२. मुळ वादाचे स्वरुप पाहता न्यायाचे हेतूस्तव उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द होऊन मिळणे जरुर आहे.

२३. जर उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करुन उत्तरार्थी याचे वारसांना याकामी सामील केल्यास अर्जाचा गुणदोषावर निकाल करणे शक्य होईल. त्यामुळे उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे.

२४. जर उत्तरार्थी याचे विरूध्द अर्ज उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करुन उत्तरार्थी याचे वारसांना याकामी सामील केल्यास दाव्याचे/अपीलाचे अनेकीकरण थांबविता येणे शक्य होईल. त्यामुळे उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे.

२५. उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करुन उत्तरार्थी याचे वारसांना याकामी सामील केल्यास उत्तरार्थी यांच्या वारसांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. त्यामुळे उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे

जरुर आहे.

२६. सारांश असा की, अपीलार्थी यांचे या अर्जातील कथनांचा आणि विशेषतः वर नमूद केलेल्या कायदेशीर तत्वांचा विचार करता माझे असे ठाम मत आहे की, उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करण्यायोग्य कारण असल्याचे अपीलार्थी यांनी शाबीत केले असून अपीलार्थी मागतात त्याप्रमाणे उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे न्याय व जरुर आहे.

२७. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी आणि मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी अंतीम आदेशाप्रमाणे असे देत आहे.

## दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ६ नियम १७ नुसारची कायदेशीर तरतुदी व मार्गदर्शक तत्वे.

२८. हे प्रस्थापित आहे की, (it is well settled principle in law), दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ६ नियम १७ चा मुख्य उद्देश दाव्यातील पक्षकारांना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार दुरूस्त करण्याची संधी देणे असा आहे. दुरूस्ती मागण्यासाठी विलंब झाला म्हणून ती दुरूस्ती नामंजूर करता येत नाही. न्यायाचे हेतूसिध्दीसाठी दाव्यामध्ये कधीही दुरूस्ती करण्याची मुभा देण्याचा न्यायालयास अधिकार आहे. दुस-या बाजूला अपरिमित नुकसान होत नसेल किंवा त्याच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयाला मुभा आहे, विरूध्द बाजूचे जर काही अपरिमित नुकसान होत असेल किंवा त्याच्यावर गंभीर अन्याय होत असेल तर न्यायालयाला कथनांमधील दुरूस्ती मान्य करण्याची मुभा नाही. जर दुरूस्ती मुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात काही बदल होणार नसेल तर दावा दुरूस्ती मान्य करणेत यावी, असे करत असतांना योग्य असेल तर न्यायालयाने विरूध्द पक्षकारांस पुरेशी भरपाई देणे बाबत विचार करावा. तसेच दाव्याचे अनेकीकरण टाळून वादी व प्रतिवादी यांच्यातील दाव्याची संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीनेही दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित असते. अर्ज केल्या तारखेच्या दिवशी जर दावा मुदती बाहेर जात असेल तर सर्वसाधारणपणे, नियमाप्रमाणे न्यायालय निःसंशय दुरूस्तीचा अर्ज मान्य करणे नाकारतात. पण हा मुद्दा पुर्णपणे न्यायलयाच्या स्वेच्छानिर्णयावर

अवलंबून असतो. हे करतांना न्यायालयाच्या अधिकाराचा गैरवापर केला जात नाही ना हे पाहिले जाते. दावा प्रलंबित असतांना जे मागावून झालेले बदल आहेत त्याकरिता दावा दुरूस्ती करू देणे हे न्यायाचे दृष्टीने योग्य ठरते. थोडक्यात, न्यायाच्या दृष्टीने योग्य असेल तेंव्हाच दुरूस्ती मान्य केली जाते.

(The purpose and object of Order VI Rule 17, C.P.C is to allow either party to alter or amend his pleadings in such manner and on such terms as may be just. Mere delay cannot be a ground to reject the amendment. The power to allow the amendment is wide and can be exercised at any stage of the proceedings in the interest of justice and the liberal approach should be the general rule particularly in cases where the other side can be compensated with the costs. Amendments are allowed in the pleading to avoid uncalled multiplicity of litigation)

२९. नामदार सर्वोच्च न्यायालयाने रेवाजीतू बिल्डर्स आणि डेव्हलपर्स विरुध्द नारायण स्वामी आणि सन्स, (२००९) १० सुप्रिम कोर्ट केसेस ८४ या अहवालित न्यायनिर्णयात दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ६ नियम १७ बाबत खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे :–

(१) दाव्याचा निकाल योग्य प्रकारे होण्यांसाठी मागितलेली दुरुस्ती आवश्यक आहे का ?
(२) मागितलेली दुरुस्ती ही विनाकारण मागितलेली नसून ती योग्य कारणासाठी मागितली आहे का ?
(३) मागितलेली दुरुस्ती मंजूर केल्यामुळे विरुध्द बाजूस निष्कारण त्रास होऊ नये किंवा विरुध्द बाजूचे पैशाने भरुन न येणारे नुकसान होऊ नये.
(४) मागितलेली दुरुस्ती नामंजूर केल्यामुळे अन्याय होऊ शकतो किंवा दाव्याचे अनेकीकरण होऊ शकते.
(५) मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप हे मुलतः किंवा पूर्णतः बदलणार आहे का ?
(६) सर्वसाधारणपणे मागितलेल्या दुरुस्तीवर आधारीत केलेला नविन दावा जर मुदतबाहय होत असेल तर अशी दुरुस्ती मंजूर करु नये.

(63. On critically analysing both the English and Indian cases, some basic principles emerge which ought to be taken into consideration while allowing or rejecting the application for amendment :

(1) whether the amendment sought is imperative for proper and effective adjudication of the case;
(2) whether the application for amendment is bonafide or malafide;
(3) the amendment should not cause such prejudice to the

other side which cannot be compensated adequately in terms of money;

(4) refusing amendment would in fact lead to injustice or lead to multiple litigation;

(5) whether the proposed amendment constitutionally or fundamentally changes the nature and character of the case; and

(6) as a general rule, the court should decline amendments if a fresh suit on the amended claims would be barred by limitation on the date of application.

These are some of the important factors which may be kept in mind while dealing with application filed under Order 6 Rule 17. These are only illustrative and not exhaustive.)

## मुद्दा क्रमांक ३ संबंधी कारणमिमांसा.

३०. अपीलार्थी यांनी प्रस्तुतचे अर्ज देवुन त्यांच्या अपीलाध्ये जी दुरूस्ती मागीतली आहे त्याचा विचार करता हे स्पष्ट होते की, उत्तरार्थी मयत झाला असल्याने त्याचे वारस या अपीलाचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे जरुर आहे. माझे मता प्रमाणे अपीलार्थी व उत्तरार्थी यांच्यातील मुळ वाद हा हक्कज्ञापन आणि कायम मनाई ताकीदीसंबंधी असल्याने मयत उत्तरार्थी याचे वारस या अपीलात आवश्यक पक्षकार ठरतात आणि म्हणून त्यांना पक्षकार करून अपील पुढे चालविण्याचा कायदेशिर अधिकार अपीलार्थी यांना आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा योग्य उल्लेख अपीलाचे कामी येणे जरुर आहे. आणि तसा खुलासा करून अपील दुरूस्त करून घेण्याचा अपीलार्थी यांना पूर्णपणे कायदेशिर हक्क व अधिकार आहे. त्याबाबत उत्तरार्थी यांचे वारस यांना कसलाही आक्षेप घेता येणार नाही. त्यामुळे अपीलार्थी मागतात तशी दुरूस्ती मंजूर केल्यास उत्तरार्थी यांचे वारस यांचे कसलेही नुकसान होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

३१. मुळ वादाचे स्वरूप आणि अपीलार्थी यांनी मागीतलेल्या प्रस्तावित दुरुस्तीचा साकल्याने विचार करता दुरुस्तीच्या या अर्जातील कथनांच्या गुणावगुणाचा विचार करण्याचे अजिबात कारण नाही असे मला वाटते. त्यामुळेही प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे जरुर आहे. यासाठी आपण बसवानप्पा भिमशा कोळी उर्फ जामदार विरुध्द सुनिल बसवानप्पा जिडगे, २००७ (६) एमएच.एल.जे. ७४० (मुंबई उच्च न्यायालय) या अहवालित न्यायनिर्णयाचा आधार घेवू शकतो.

३२. जरी अपीलार्थी यांचे मागणीप्रमाणे दुरुस्ती केलेस उत्तरार्थी यांचे वारस यांना निश्चितच त्यांचा बचाव मांडता येईल. त्यामुळे सदरची दुरुस्ती ही अपीलात येणे आवश्यक आहे असे मला वाटते. यासाठी आपण अशोक गौरीशंकर सलगर विरुध्द गौरम्माबाई संन्मुख गौडा पाटील, १९९४ एमएच.एल. जे. २८६ (मुंबई उच्च न्यायालय) या अहवालित न्यायनिर्णयाचा आधार घेवू शकतो.

३३. माझे मताप्रमाणे अपीलार्थी मागत असलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मूळ वादविषयाशी संबंधीतच आहे. अपीलाचे स्वरूप आणि अपीलार्थी यांनी मागीतलेली प्रस्तावित दुरुस्ती लक्षात घेता दुरुस्ती केल्याशिवाय सदरचे अपील अंतिम निर्णयाप्रत येऊ शकणार नाही. तसेच दाव्याचे आणि अपीलाचे अनेकीकरण चुकवून अपीलार्थी व उत्तरार्थी यांचे वारस यांचेतील दाव्यांची/अपीलाची संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने सदरची दुरूस्ती करणे न्यायोचित ठरणार आहे अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

३४. थोडक्यात, अपीलार्थी हे प्रस्तावित दुरुस्तीने त्यांचे अपीलात कोणतीही विधानविरोधी व विसंगत (contradictory or inconsistent) मागणी मागत नाहीत. उत्तरार्थी यांचा बचाव सुध्दा कोणत्याही प्रकारे बाधित (prejudice) होत नाही. त्यामुळे अपीलार्थी व उत्तरार्थी यांचे वारस यांचेमधील मूळ वादाचे (real controversy) अंतिम निराकरण करण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे जरुर आहे. यासाठी आपण विजयकुमार नारायणराव दिक्षीत विरुध्द उदय गृह निर्माण समस्या निवारण संस्था, नागपूर, २००६ (३) एमएच.एल.जे. ६७६ (मुंबई उच्च न्यायालय) या अहवालित न्यायनिर्णयाचा आधार घेवू शकतो.

३५. त्याही पुढे जाऊन माझे असे ठाम मत आहे की, नामदार सर्वोच्च न्यायालयाने रेवाजीतू बिल्डर्स आणि डेव्हलपर्स विरुध्द नारायण स्वामी आणि सन्स, (२००९) १० सुप्रिम कोर्ट केसेस ८४ या अहवालित न्यायनिर्णयात क्रम ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्ती मंजूर किंवा नामंजूर करतांना न्यायालयाने ज्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे याबाबत जे निष्कर्ष नोंदविले आहेत त्या सर्व निष्कर्षामध्ये अपीलार्थी यांनी मागितलेली दुरुस्ती बसते (the amendment sought by the appellant's L.Rs. is permissible on the touchstone of all the tests). त्यामुळे

वर नमूद केलेल्या कायदेशीर तत्वांचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य व कायदेशीर आहे.

३६. सबब, मी मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर होकारार्थी अंतीम आदेशाप्रमाणे असे देत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ संबंधी कारणमिमांसा.**

३७. माझ्या मुद्दे क्रमांक १ ते ३ वरील कारण मिमांसेवरुन आणि उत्तरावरुन उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करण्यायोग्य कारण असल्याचे अपीलार्थी यांनी शाबीत केल्यामुळे अपीलार्थी मागतात त्याप्रमाणे उत्तरार्थी याचे विरूध्द अपील उपशमित झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे जरुर आहे. तथापी या अपीलाचे कामी अनवधानाने उत्तरार्थी यांचे वारस या कामी सामिल करण्याचे राहून गेले होते असे कोणत्याही कारणावरुन मानता येणार नाही. उत्तरार्थी हे दिनांक सप्टेंबर २०१३ रोजी मयत असून अपीलार्थी यांनी दिनांक २१/०४/२०१६ रोजी म्हणजेच साधारणपणे ३ वर्ष इतक्या कालावधीनंतर दिले आहेत. याप्रमाणे हे अर्ज देईपावेतो अपीलार्थी का थांबले याचे समाधानकारक उत्तर अपीलार्थी यांचे अर्जावरुन मिळत नाही.

३८. अपीलार्थी यांचे वेळ काढण्याच्या धोरणामुळे व निष्काळजीपणामुळे उत्तरार्थी यांचे वारस यांना निष्कारण त्रास सोसावा लागला आहे आणि अपीलाचे कामही लांबणीवर पडले आहे. या सर्व कारणांचा आणि नामदार सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचा विचार करता अपीलार्थी यांचेसोबत शासन म्हणजेच तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर हेही खर्च (costs) मिळण्यास पात्र आहेत. अपीलाचे स्वरुप झालेला विलंब, अपीलार्थी यांची एकंदरीत वर्तणूक आणि अपीलाची असलेली स्थिती या सर्वांचा साधक–बाधक विचार केल्यानंतर (considering the nature of appeal, delay caused and the overall conduct of appellants and the stage of this appeal) सदर खर्चाची रक्कम मी एकूण रुपये ५,०००/– (रुपये पाच हजार फक्त) इतकी निश्चीत करीत आहे. अपीलार्थी यांनी खर्चाची रक्कम जमा केल्यास त्यापैकी रक्कम रुपये ४,९००/– ( रुपये चार हजार नऊशे फक्त) घेण्याचा उत्तरार्थी यांचे वारस यांना हक्क राहिल आणि रक्कम १००/–(रुपये शंभर फक्त) ही तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांचे खात्यावर जमा करण्यांत यावी.

३९. सबब, मी मुद्दा ४ चे उत्तर अर्ज मंजूर अंतिम आदेशाप्रमाणे असे देत आहे.

४०. मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

| | |
|---|---|
| १. | अपीलार्थी यांचे अर्ज (निशाणी २८ व ३१) मंजूर करणेत येत आहेत. |
| २. | अपीलार्थी यांनी सदर अपीलाचे खर्चापोटी उत्तरार्थी क्रमांक ३-तुकाराम भाऊ शेंडगे यांचे वारसांना आणि तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांना एकूण रक्कम रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) दिनांक ०९/०२/२०२३ रोजी किंवा तत्पूर्वी देणेची किंवा जमा करण्यांची आहे. जर याप्रमाणे खर्चाची रक्कम दिली नाही अथवा न्यायालयात जमा केली नाही तर अर्ज (निशाणी २८ व ३१) वरील हुकूम आपोआपच नामंजूर होईल. |
| ३. | उत्तरार्थी क्रमांक ३-तुकाराम भाऊ शेंडगे याच्या विरुध्द अर्ज उपशमित झालेचा आदेश रद्द होणेसाठी अर्ज देण्यास झालेला विलंब माफ करणेत येत आहे. |
| ४. | उत्तरार्थी क्रमांक ३-तुकाराम भाऊ शेंडगे याच्या विरुध्द अर्ज उपशमित झालेचा आदेश रद्द करणेत येत आहे. |
| ५. | उत्तरार्थी यांचे वारस यांना याकामी सामील करून अर्जात मागणी केल्याप्रमाणे अर्ज दुरूस्ती करणे करिता अपीलार्थी यांना परवानगी देणेत येत आहे. |
| ६. | अपीलार्थी यांनी दिनांक ०९/०२/२०२३ किंवा तत्पुर्वी मंजूर आदेशाप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन घेऊन उत्तरार्थी क्रमांक ३-तुकाराम भाऊ शेंडगे यांचे वारस यांचे करिता दुरूस्त अर्जाची प्रत ताबडतोब देणेची आहे. जर या निश्चित केलेल्या कालावधीत अपीलार्थी यांनी अर्जात दुरूस्ती करून अर्ज दुरूस्तीची प्रत दिली नाही तर दुरूस्तीचा हुकूम आपोआपच नामंजूर होईल. |
| ७. | अपीलार्थी यांनी जमा केलेल्या खर्चाच्या रकमेपैकी उत्तरार्थी क्रमांक ३-तुकाराम भाऊ शेंडगे यांचे वारसांना रक्कम रुपये रुपये ४,९००/- ( रुपये चार हजार नऊशे फक्त) घेण्याचा हक्क राहील. |

| | |
|---|---|
| ८. | अपीलार्थी यांनी जमा केलेल्या खर्चाच्या रकमेपैकी रक्कम रुपये १००/-(रुपये शंभर फक्त) तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांचे खात्यावर जमा करणेची आहे. |

(खुले न्यायालयात अधिघोषित).

MAHESH BALKRISHNA LAMBE

Digitally signed by MAHESH BALKRISHNA LAMBE
Date: 2023.01.07 12:43:19 +0530

दिनांक : ०५/०१/२०२३

( महेश बा. लंबे )
जिल्हा न्यायाधीश – १,
पंढरपूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| (a)Name of the Stenographer | : | Sou. M. M. Kulkarni |
| (b)Court | : | M. B. Lambe, District Judge – 1 & Addl. Sessions Judge, Pandharpur. |
| (c)Order signed by P.O. on | : | 05/01/2023 |
| (d)Order uploaded on | : | 07/01/2023 |